# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 20/10/2021 (बुधवार)
(दुपार)

---

### अपघातात मृत्यू

पो.स्टे. मौदा :– अंतर्गत 12 कि.मी. अंतरावरील एन.एच–53 महादूला फाटा, शिवालीक ढाबा समोर येथे दि. 18/10/2021 चे 18.30 वा. सुमारास एम.एच– 36/ए.ई– 3408 कमांकाची मोटरसायकलचा चालक मृतक नामे– गजानन भैयाजी मते, वय 40 वर्षे, रा. नेरी ता. मोहाडी जि. भंडारा हा भंडारा वरून नागपूर कडे जात असता मागून अज्ञात ट्रक चालक आरोपीने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवून धडक दिली. या अपघातात मोटरसायकल चालक हा गंभीर जखमी होवुन जागीच मरण पावला.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस हवालदार देवीदास पवार यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. सहकलम 184, 134/177 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोहवा पवार मो नं. 9823037279 हे करीत आहे.

### रेती चोरी करणाऱ्या आरोपीला अटक

पो.स्टे. अरोली :– अंतर्गत 14 किमी अंतरावर मौजा मोरगाव शिवार येथे दिनांक 18/10/2021 चे 17.30 वा. ते 18. 00 वा. दरम्यान एमएच–40/एल–1485 क्रमांकाचा ट्रक्टरचा चालक आरोपी क्र– 1) विष्णु दशरथ ठवकर वय 40 वर्ष रा. वाकेश्वर ता. मौदा याने आरोपी क्र– 2) ट्रक मालक आरोपी नामे– प्रविण वसंता भिवगडे रा. धर्मापूरी ता. मौदा याच्या सांगण्यावरून त्याच्या ताब्यातील वाहनात सिरसोली शिवारातील सुर नदीच्या पात्रातील विना परवाना अवैधरित्या 1 ब्रास रेती किं. 4,000/–रू. चा मुद्देमाल भरून वाहतुक करतांना मिळुन आले. वाहनासह एकुण 3,54,000/–रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सर तर्फे पोलिस हवालदार भगवान चांदेवार पो.स्टे. अरोली यांच्या रिपोर्ट वरून पो.स्टे. अरोली येथ आरोपीविरुध्द कलम 379, 109 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक श्री अशोक कोळी मो. क्र. 8080872474 हे करीत आहे.

## गैरकायदयाची मंडळी

पो.स्टे. सावेनर :– फिर्यादी नामे– निरंजन हरिमणजी पाटील वय 39 वर्ष रा. वार्ड क्र 02 तेलकामठी ता कळमेश्वर यांची आरोपी क्र 1) सौ. निकीता निरंजन पाटील ही पत्नी असुन त्यांना एक प्रणय नावाचा 12 वर्षाचा मुलगा व एक 11 वर्षाची प्रांजली नावाची मुलगी आहे. यातील आरोपी क्र 1 ही 9 महिण्यापासुन नागपुरला माहेरी राहत असतांना दिनांक 19/10/2021 चे 00.40 वा ते 01.00 वा. दरम्यान मौजा तेलकामठी येथे आरोपी क्र 1 व 2) सौ. माया दिलीप पाटील(फिर्यादीची सासु) व इतर 4 अनोळखी ईसम सर्व रा. नागपुर यांनी गैरकायदयांची मंडळी जमवुन फिर्यादी व फिर्यादीचा मोठे भाउ दिलीप पाटील यांचे घरी आरोपी क्र 1 व 2 यांनी अनाधिकृतपणे प्रवेश करुन फिर्यादीचा मुलगा प्रणय व मुलगी प्रांजली हिला घेवुन जात असतांना फिर्यादी व फिर्यादीचा पुतण्या आकाश पाटील मधात गेले असता आरोपीतांनी शिवीगाळ करून हातबुक्यांनी मारहाण केली. यानंतर आरोपीतांनी फिर्यादी यांना मारण्याची करण्यांची धमकी दिली व घराचा दरवाजा चा पल्ला तोडुन ऑटोचा समोरचा काच तोडुन सायकल खाली जमिनीवर पाडुन नुकसान करुन फिर्यादीचा दोन्ही मुलगा व मुलगी ला सोबत घेवुन गेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीतांविरुध्द कलम 143, 448, 323, 504, 506, 427 भादंवी कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सूरू असून गुन्हयाचा पुढील तपास साफौ. देवशंकर गुप्ता मो. नं. 9511247261 हे करीत आहे.

## अकस्मात मृत्यू

पो.स्टे. काटोल :– अंतर्गत 4 किमी. अंतरावरील सिंदेवानी येथे दिनांक 17/10/2021 चे 09.30 वा. दरम्यान कु अंजली नामदेव दुधकवळे वय 17 वर्ष रा एनवा ता काटोल हिने गव्हाचे ढोल्यामधुन गहु काढत असतांना गव्हाचे ढोल्याच्या वर झाकणावर ठेवलेले गव्हातिल सोंडे मारण्याचे पावडर अचानक मृतकाचे ताटात पडल्याने व ते जेवण खाल्याने उलटी होवुन तिची प्रकृती खराब झाली. तिला येणवा ग्रामीण रूग्णालय येथे नेले असता तेथील डॉक्टरांनी तपासुन नागपुर रेफर केल्याने नागपुर येथील एम्स हॉस्पिटल मिहाण नागपुरला आणुन भर्ती केले व तेथे उपचारा दरम्याण दि 18/10/21 चे रात्री 1.30 वा दरम्यान डॉक्टरांनी तपासुण मृत घोषित केले. सदर मृतकाचे मरण्याचे कागदपत्र पोस्टे ला प्राप्त झाल्याने सदर मर्ग नोंद.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस नाईक अमित रिंके यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार वाघ 9823348374 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर